**अधिसूचना**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई 400 032.
दिनांक :- 2 जुलै, 2016

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977

क्र. सीईटी-2015/(प्र.क्र.149)/टिएनटी-1.- महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977 (1978 चा महा.3) याच्या कलम 16 ची पोटकलमे (1) व (2) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, 1981 मध्ये आणखी सुधारणा करण्याचे प्रस्तावित केलेल्या नियमांचा पुढील मसुदा, त्यामुळे बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमांच्या कलम 16, पोट-कलम (3) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा दिनांक 17 जुलै, 2016 रोजी अथवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

2. उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्यादी व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगूरू चौक, मंबई- 400 032 यांच्याकडे प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

## <u>नियमांचा मसुदा</u>

1. या नियमांस, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (दुसरी सुधारणा) नियमावली 2016 असे म्हणावे.

2. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती), नियमावली, 1981 याच्या नियम 2 मध्ये (यात यापुढे ज्यांचा निर्देश "मूळ नियमावली" असा करण्यात आला आहे. ) याच्या पोटनियम (1) मध्ये, -

(क) खंड (ब) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल;-

"(ब-1) "अभियोग्यता चाचणी" म्हणजे शासन अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी शासनाद्वारे किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अभिकरणाद्वारे घेण्यात येणारी चाचणी ;";

(ख) खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:-

"(इ-1)"पात्रता चाचणी" म्हणजे, अभियोग्यता चाचणी देण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांकरिता शासनाद्वारे किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अभिकरणाद्वारे घेण्यात येणारी चाचणी ;".

3. मूळ नियमावलीच्या नियम 3 मधील पोटनियम (1) मध्ये, खंड (अ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

"(अ) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 (2009 चा 35) याला जोडलेल्या " शाळेसाठी मानके आणि प्रमाणके" या शीर्षाखालील अनुसूचीत तरतूद केलेल्या मानके आणि प्रमाणकांनुसार इयत्ता पहिली ते आठवीसाठी असणारी शाळा;".

4. मूळ नियमावलीच्या नियम 6 ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल,:-

**" 6. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अर्हता:-**

(1) प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि कनिष्ठ शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदाची किमान अर्हता ही अनुसूची "ब" मध्ये दिल्याप्रमाणे असावी.

(2) खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी (इयत्ता पहिली ते आठवी सह ) शासन किंवा शासनाने प्राधिकृत केलेले अभिकरण, वेळोवेळी पात्रता चाचणी आणि अभियोग्यता चाचणी घेईल.

(3) जो उमेदवार पात्रता चाचणी उत्तीर्ण झाला असेल तो अभियोग्यता चाचणी देण्यासाठी पात्र असेल.

(4) पदासाठी विहित करण्यात आलेल्या वयोमर्यादेपर्यंत उमेदवार गुणांमध्ये सुधारणा करण्यासाठी पाच वेळा अभियोग्यता चाचणी देऊ शकतो.

(5) विशिष्ट प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी शिथिल केलेल्या वयोमर्यादेसह पदासाठी विहित असलेल्या वयोमर्यादेपर्यंत अभियोग्यता चाचणीमध्ये मिळविलेले गुण वैध असतील.

(6) शासन, पात्रता व अभियोग्यता चाचणी घेण्यासाठी वेळोवेळी पाठ्यक्रम विनिर्दिष्ट करील आणि अनुसरावयाची कार्यपद्धती नमूद करील."

5. मूळ नियमावलीच्या नियम 9 मध्ये,-

(क) पोटनियम(2) नंतर पुढील पोटनियम समाविष्ट करण्यात येतील:-

"(2अ) खाजगी शाळा व्यवस्थापन, शासनाने किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अभिकरणाने विकसित केलेल्या ऑनलाईन संगणकीय प्रणालीवर बिंदूनामावलीसह विषयांच्या तपशीलानुसार रिक्त पदांची जाहिरात देईल तसेच त्या प्रदेशात सर्वाधिक खप असलेल्या किमान एका स्थानिक वृत्तपत्रामध्ये पदाची जाहिरात प्रकाशित करील. तसेच ती रिक्त पदे जिल्हा सेवायोजन कार्यालयाच्या व जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याच्याही निदर्शनास आणून देईल.

(2ब) उक्त जाहिरात, संबंधित पद भरण्यापूर्वी किमान 15

दिवसांसाठी खुली ठेवण्यात येईल.  उक्त जाहिरातीस प्रतिसाद देऊन रिक्त पद भरण्याकरिता उमेदवारांना ऑनलाईन प्रक्रियेमार्फत अर्ज करता येईल किंवा नाव, पत्ता, जन्मतारीख, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, अनुभव इत्यादींचा सविस्तर तपशील व अभियोग्यता चाचणीत प्राप्त केलेले गुण आवेदनपत्रामध्ये देऊन लेखी अर्ज करता येईल.  जाहिरातीत नमूद केलेली मुदत संपल्यानंतर शाळा समिती कामाकाजाच्या पाच दिवसांमध्ये गुणवत्ता यादी प्रसिद्ध करील व गुणवत्ता यादीनुसार उमेदवाराची निवड करील.";

(ख) पोट नियम (3) मधील "शिक्षकवर्गीय किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(क) पोट नियम (8) ऐवजी पुढील पोटनियम दाखल करण्यात येईल :-

"(8) जर पोट नियम (7) मध्ये विनिर्दिष्ट केलेली पदे पोट नियम (2अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर रिक्त राहत असतील तर, व्यवस्थापन, उक्त रिक्त पदे भरण्यासाठी पोटनियम (9) मध्ये निर्धारित केलेली कार्यपद्धती स्वीकारील. ".

6. मूळ नियमावलीच्या अनुसूची "ब" मध्ये,-

(अ) नोंद एक ऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईल:-

" एक. **प्राथमिक शिक्षकांच्या अर्हता-** इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या प्राथमिक शिक्षकांची किमान अर्हता बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 (2009 चा 35) याअन्वये राष्ट्रीय शिक्षक परिषदेने निर्धारित केलेल्या अर्हतानुसार, असेल.";

(ख) नोंद दोन मधील पोटनोंद (1) मध्ये,-

(एक) खंड (सहा) च्या ऐवजी "आणि" हा शब्द जादा दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (सहा) नंतर पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल:-

"शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली अर्हताकारी अभियोग्यता चाचणी";

(ग) नोंद तीन मध्ये,-

(एक) पोट नोंद (1) खालील खंड (क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल:-

"(क) शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली अर्हताकारी अभियोग्यता चाचणी.";

(दोन) खंड (ड) वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

शासनाचे

उपसचिव

**अधिसूचना**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई 400 032.
दिनांक :- 2 जुलै, 2016

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977

क्र. सीईटी-2015/(प्र.क्र.149)/टिएनटी-1.- महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977 (1978 चा महा.3) याच्या कलम 16 ची पोटकलमे (1) व (2) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, 1981 मध्ये आणखी सुधारणा करण्याचे प्रस्तावित केलेल्या नियमांचा पुढील मसुदा, त्यामुळे बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमांच्या कलम 16, पोट-कलम (3) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा दिनांक 17 जुलै, 2016 रोजी अथवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

2. उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्यादी व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगूरू चौक, मंबई- 400 032 यांच्याकडे प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

## <u>नियमांचा मसुदा</u>

1. या नियमांस, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (दुसरी सुधारणा) नियमावली 2016 असे म्हणावे.

2. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती), नियमावली, 1981 याच्या नियम 2 मध्ये (यात यापुढे ज्यांचा निर्देश "मूळ नियमावली" असा करण्यात आला आहे.) याच्या

पोटनियम (1) मध्ये, -
(क) खंड (ब) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल;-
"(ब-1) "अभियोग्यता चाचणी" म्हणजे शासन अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी शासनाद्वारे किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अभिकरणाद्वारे घेण्यात येणारी चाचणी ;";
(ख) खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:-
"(इ-1)"पात्रता चाचणी" म्हणजे, अभियोग्यता चाचणी देण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांकरिता शासनाद्वारे किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अभिकरणाद्वारे घेण्यात येणारी चाचणी ;".

3. मूळ नियमावलीच्या नियम 3 मधील पोटनियम (1) मध्ये, खंड (अ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :-
"(अ) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 (2009 चा 35) याला जोडलेल्या " शाळेसाठी मानके आणि प्रमाणके" या शीर्षाखालील अनुसूचीत तरतूद केलेल्या मानके आणि प्रमाणकांनुसार इयत्ता पहिली ते आठवीसाठी असणारी शाळा;".

4. मूळ नियमावलीच्या नियम 6 ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल,:-

**" 6. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अर्हता:-**

(1) प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि कनिष्ठ शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदाची किमान अर्हता ही अनुसूची "ब" मध्ये दिल्याप्रमाणे असावी.

(2) खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी ( इयत्ता पहिली ते आठवीसह ) शासन किंवा शासनाने प्राधिकृत केलेले अभिकरण, वेळोवेळी पात्रता चाचणी आणि अभियोग्यता चाचणी घेईल.

(3) जो उमेदवार पात्रता चाचणी उत्तीर्ण झाला असेल तो अभियोग्यता चाचणी देण्यासाठी पात्र असेल.

(4) पदासाठी विहित करण्यात आलेल्या वयोमर्यादेपर्यंत उमेदवार गुणांमध्ये सुधारणा करण्यासाठी पाच वेळा अभियोग्यता चाचणी देऊ शकतो.

(5) विशिष्ट प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी शिथिल केलेल्या वयोमर्यादेसह पदासाठी विहित असलेल्या वयोमर्यादेपर्यंत अभियोग्यता चाचणीमध्ये मिळविलेले गुण वैध असतील.

(6) शासन, पात्रता व अभियोग्यता चाचणी घेण्यासाठी वेळोवेळी पाठ्यक्रम विनिर्दिष्ट करील आणि अनुसरावयाची कार्यपद्धती नमूद करील."

5. मूळ नियमावलीच्या नियम 9 मध्ये,-

(क) पोटनियम(2) नंतर पुढील पोटनियम समाविष्ट करण्यात येतील:-

"(2अ) खाजगी शाळा व्यवस्थापन, शासनाने किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अभिकरणाने विकसित केलेल्या ऑनलाईन संगणकीय प्रणालीवर बिंदूनामावलीसह विषयांच्या तपशीलानुसार रिक्त पदांची जाहिरात देईल तसेच त्या प्रदेशात सर्वाधिक खप असलेल्या किमान एका स्थानिक वृत्तपत्रामध्ये पदाची जाहिरात प्रकाशित करील. तसेच ती रिक्त पदे जिल्हा सेवायोजन कार्यालयाच्या व जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याच्याही निदर्शनास आणून देईल.

(2ब) उक्त जाहिरात, संबंधित पद भरण्यापूर्वी किमान 15

दिवसांसाठी खुली ठेवण्यात येईल. उक्त जाहिरातीस प्रतिसाद देऊन रिक्त पद भरण्याकरिता उमेदवारांना ऑनलाईन प्रक्रियेमार्फत अर्ज करता येईल किंवा नाव, पत्ता, जन्मतारीख, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, अनुभव इत्यादींचा सविस्तर तपशील व अभियोग्यता चाचणीत प्राप्त केलेले गुण आवेदनपत्रामध्ये देऊन लेखी अर्ज करता येईल. जाहिरातीत नमूद केलेली मुदत संपल्यानंतर शाळा समिती कामाकाजाच्या तीन दिवसांमध्ये गुणवत्ता यादी प्रसिद्ध करील व गुणवत्ता यादीनुसार उमेदवाराची निवड करील.";

(ख) पोट नियम (3) मधील "शिक्षकवर्गीय किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(क) पोट नियम (8) ऐवजी पुढील पोटनियम दाखल करण्यात येईल :-

"(8) जर पोट नियम (7) मध्ये विनिर्दिष्ट केलेली पदे पोट नियम (2अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर रिक्त राहत असतील तर, व्यवस्थापन, उक्त रिक्त पदे भरण्यासाठी पोटनियम (9) मध्ये निर्धारित केलेली कार्यपद्धती स्वीकारील. ".

6. मूळ नियमावलीच्या अनुसूची "ब" मध्ये,-

(अ) नोंद एक ऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईल:-

" एक. **प्राथमिक शिक्षकांच्या अर्हता-** इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या प्राथमिक शिक्षकांची किमान अर्हता बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 (2009 चा 35) याअन्वये राष्ट्रीय शिक्षक परिषदेने निर्धारित केलेल्या अर्हतानुसार, असेल.";

(ख) नोंद दोन मधील पोटनोंद (1) मध्ये,-

(एक) खंड (सहा) च्या ऐवजी "आणि" हा शब्द जादा दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (सहा) नंतर पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल:-

"शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली अर्हताकारी अभियोग्यता चाचणी";

(ग) नोंद तीन मध्ये,-

(एक) पोट नोंद (1) खालील खंड (क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल:-

"(क) शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली अर्हताकारी अभियोग्यता चाचणी.";

(दोन) खंड (ड) वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

शासनाचे

उपसचिव